| Names of Trustees | विश्वस्तांची नावे |
|---|---|
| 1. Dr. Ainapure Vilas, President | डॉ. ऐनापुरे विलास, अध्यक्ष |
| 2. Shri. Damle Gajanan, Secretary (till Nov.2019) | श्री. दामले गजानन, कार्यवाह (नोव्हे.२०१९ पर्यंत) |
| 3. Shri. Joshi Shrikant, Secretary (since Dec.2019) | श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह (डिसें.२०१९ पासून) |
| 4. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer | श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा |
| 5. Smt. Barve Usha (since 01.09.2019) | श्रीमती बर्वे उषा (०१.०९.२०१९ पासून) |
| 6. Shri. Desai Shrikrishna | श्री. देसाई श्रीकृष्ण |
| 7. Adv. Gaonkar Prasad | ॲड. गांवकर प्रसाद |
| 8. Shri. Kadhe Janardan | श्री. कढे जनार्दन |
| 9. Shri. Nalawde Laxman (till 31.08.2019) | श्री. नलावडे लक्ष्मण ( ३१.०८.२०१९ पर्यंत) |
| 10. Dr. S. Raman Srinivasa | डॉ. एस. रामन श्रीनिवासा |
| 11. Shri. Saraf Nagnath | श्री. सराफ नागनाथ |
| 12. Shri. Vaidya Ramchandra | श्री. वैद्य रामचंद्र |

| Names of Managing Committee Members | कार्यकारिणी सदस्यांची नावे |
|---|---|
| 1. Smt. Barve Usha, Chairperson (till 31.08.2019) | श्रीमती बर्वे उषा, कार्याध्यक्षा (३१.०८.२०१९ पर्यंत) |
| 2. Smt. Gadre Anjali, Chairperson (since 01.09.2019) | श्रीमती गद्रे अंजली, कार्याध्यक्षा (०१.०९.२०१९ पासून) |
| 3. Shri. Damle Gajanan, Secretary (till Nov.2019) | श्री. दामले गजानन, कार्यवाह (नोव्हे.२०१९ पर्यंत) |
| 4. Shri. Joshi Shrikant, Secretary (since Dec.2019) | श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह (डिसें.२०१९ पासून) |
| 5. Smt. Raykar Sanjeevani, Treasurer | श्रीमती रायकर संजीवनी, कोषाध्यक्षा |
| 6. Dr. Bhagwat Sanjay, Member | डॉ. भागवत संजय, सदस्य |
| 7. Smt. Dhakras Sandhya, Member | श्रीमती धाक्रस संध्या, सदस्य |
| 8. Smt. Joshi Shobha, Member | श्रीमती जोशी शोभा, सदस्य |
| 9. Shri. Sathe Vidyadhar, Member | श्री. साठे विद्याधर, सदस्य |
| 10. Smt. Vaishampayan Geeta, Member | श्रीमती वैशंपायन गीता, सदस्य |


## AUDITORS

**M/s. CVK & Associates (Chartered Accountant)**

103, Varad Laxmi, Gokhale Road,

Mulund (East), Mumbai 400 081.

# दृष्टीक्षेपात वात्सल्य

## VATSALYA AT A GLANCE

संस्थेचे नाव : **वात्सल्य ट्रस्ट, मुंबई**

Name of Institution : **VATSALYA TRUST, MUMBAI**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा नोंदणीक्रमांक

Registration No. under Maharashtra Public Trust Act

**E. 9180 / BOM 8.2.83**

आयकर खात्याच्या कलम १२ (अ) खाली नोंदणीक्रमांक

Registration No. under Section 12 (A) of income Tax Act

**TR/16007, dt. 12.7.83**

आयकर खात्याच्या कलम ८० (जी) खाली नोंदणीक्रमांक

Registration No. under Section 80 (G) of income Tax Act

**DIT(E)MC/80 (G) 1615/2009**

Dt. 1.4.2009 (certificate is valid TILL 30.06.2020 )

विदेशातून देणग्या घेण्याबाबत केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाकडून मिळालेल्या प्रमाणपत्राचा नोंदणी क्र.

Registration under Foreign Exchange Regulation Act, 1976

**FCRA No. : 083780862**

PAN NO.

**AAATV0345H**

## Addresses, Telephone Nos. and Email ids of our Projects

**KANJURMARG**

Near Kanjurmarg Police Station, Kanjurmarg (East), Mumbai 400 042.

Tel. Nos. 2578 2958 / 2579 4798 / 2578 4810 / 8833243144

Email id : vatsalyatrustmumbai@gmail.com

**SANPADA**

Plot No. 11, Sector No.2, Near Oriental College, Sanpada, Navi Mumbai 400 705.

Tel. Nos. 2775 7390 / 2775 3689 / 8422883148

Email id : vatsalyatrust_sanpada@yahoo.com

**ALIBAG**

House No. 1510-B-2, Behind Mayur Bakery, Alibag, Dist. Raigad 402 201.

Tel. Nos. 02141- 220216

Email id : vatsalyatrustalibag@gmail.com

**BADLAPUR**

Mauje Bhoj, Survey No.12/1, 12/2, 13/1, Badlapur, Dist. Thane

# <u>Names of Banks and Account Nos. for ONLINE DONATION</u>

**Account Name : VATSALYA TRUST MUMBAI**

1. **STATE BANK OF INDIA – Kanjur Marg**
   Branch Code – 06249
   IFSC Code – SBIN0006249
   Savings Account No. – 10034092104

2. **STATE BANK OF INDIA – Kanjur Marg (only for Foreign Donations)**
   Branch Code – 06249
   IFSC Code – SBIN0006249
   MICR No. – 400002044
   Swift Code – SBININ -BB 836
   Account No. – 10034092115

3. **INDIAN OVERSEAS BANK – Sanpada Project**
   IFSC Code – IOBA0001502
   Savings Account No. – 150201000001551

4. **BANK OF MAHARASHTRA – Alibag Project**
   IFSC Code – MAHB0000229
   Savings Account No. – 20109646941

भारत सरकारद्वारे FCRA Act च्या सुधारित नियमावलीप्रमाणे संस्थेचा Foreign Account No. बदलणार आहे याची परदेशस्थ देणगीदारांनी कृपया नोंद घ्यावीयापुढे . <u>**परदेशस्थ देणगीदारांनी**</u> NEFT द्वारे देणगी देण्यापूर्वी संस्थेशी संपर्क साधून Account No. विचारून घ्यावा ही विनंती.

# नम्र विनंती


आजकालच्या काळात समाजातील काही वाईट घटक 'वात्सल्य' च्या नावावर निधी संकलित करण्याचा प्रयत्न करत आहेत. या अहवालाद्वारे आपणा सर्व देणगीदार / हितचिंतक यांस कळकळीची विनंती आहे की आपण आपली देणगी शक्यतो धनादेशाद्वारे अथवा ONLINE सेवेद्वारे द्यावी. तसेच देणगीदारांनी आपला इमेल आय. डी. आणि मोबाईल क्रमांक संस्थेच्या इमेलवर जरूर कळवावा. जेणेकरून इमेलद्वारे संस्थेचा वार्षिक अहवाल पाठवणे आम्हाला सोपे जाईल. संस्थेचा इमेल आय. डी. - vatsalyatrustmumbai@gmail.com तसेच संस्थेची स्वतंत्र वेबसाईटदेखील आहे vatsalyatrustmumbai.org

'वात्सल्य' च्या नावाचे ओळखपत्र व पावतीपुस्तक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे देणगीची रक्कम, धान्य, कपडे अथवा इतर वस्तुरूप देणगी देऊ नयेत. संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे ओळखपत्र व पावतीपुस्तक दिलेलेच असते. कृपया देणगी देताना या सर्व बाबींची खातरजमा करून घ्यावी.

देणगीचा धनादेश **'वात्सल्य ट्रस्ट, मुंबई'** या नावाने काढावा.

ऑन लाईन पेमेंट साठी **Website Payment Gateway (SBI Collect) चा वापर करावा.**

**Master, VISA, RuPay, Credit / Debit Cards अशा विविध कार्डचा वापर करूनही आपण देणग्या देऊ शकता.**



## श्री. गजानन अनंत दामले

सर्व हितचिंतक व देणगीदार यांना कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की संस्थेचे संस्थापक व कार्यवाह श्री. गजानन अनंत दामले यांचे दि. १५ नोव्हेंबर २०१९ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुख:द निधन झाले.

निवृत्तीनंतर वयाच्या ६० व्या वर्षी जेव्हा साठवलेलं जपत जपत पैलतीराकडे वाटचाल करायची, त्या वयात असामान्य उमेदीने काहीतरी नवीन जन्माला घालायचे या ध्यासाने पछाडलेले आपले सर्वांचे लाडके दामलेकाका यांनी आपल्या काही सहका-यांसोबत सन १९८३ साली 'वात्सल्य' ची स्थापना केली. त्यांत डॉ. शिवराम द. आठवले, श्रीमती संजीवनीताई रायकर, श्री. अनंतराव कुलकर्णी यांचा समावेश होता. त्यांची जिद्द खरंच वाखाणण्याजोगी होती. 'वात्सल्य' चे कार्य करता करता ते पूर्णपणे वात्सल्यमय होऊन गेले होते. त्यावेळी आपण लावलेले हे इवलेसे रोपटे पुढे एवढे मोठे रूप धारण करेल असे त्यांना स्वप्नातही खरे वाटले नसते. पण दामलेकाकांच्या परिश्रमांचे चीज झाले. आपल्या श्रमांचे फळ मिळून आपल्या हयातीत त्याची तृप्तता अनुभवायला मिळणे दामलेकाकांच्या भाग्यात होते. आज वात्सल्यमध्ये अर्भकालयात एक दिवसाच्या बाळापासून ते वृद्धाश्रमात एक्याण्णव वर्षीय आजीपर्यंत सर्वच आश्रितांना तितक्याच प्रेमाने व आत्मीयतेने सांभाळले जाते.

'वात्सल्य' चे नाव त्यांनी खूप उंचीवर नेऊन ठेवले आहे. या समाजसेवेप्रीत्यर्थ दामले काकांना अनेक पुरस्कार मिळाले. परंतु ते आपले कार्य निरलस हेतूने शेवटपर्यंत करत राहिले. राजकारणापासून अलिप्त, साधी राहणी, परखड पण निर्व्याज मनाचा असा अतिशय सच्चा कार्यकर्ता म्हणून दामलेकाकांची ओळख सांगता येईल.

एक पर्व जरी संपले असले तरी त्यांनी करून ठेवलेले कार्य त्याच निस्सीम भावनेने पुढे सुरु ठेवणे नव्हे तर आणखी वृद्धिंगत करणे हि आपणाकडून त्यांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.

दि. १ एप्रिल २०१९ ते दि. ३१ मार्च २०२० चा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करत आहोत.

'वात्सल्य' चे सर्व कार्यकर्ते व देणगीदार व हितचिंतक यांचे मन:पूर्वक आभार !!

**COVID 19 मुळे २०२० २१ अहवालसालातील वार्षिक स्नेहसंमेलन होऊ शकले नाही याची – .कृपया नोंद घ्यावी**

## विश्वस्त मंडळ

संस्थेचे विश्वस्त श्री. लक्ष्मण नलावडे यांनी आपल्या वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला. त्यांच्या रिक्त पदी संस्थेच्या कार्यकारिणीच्या कार्याध्यक्षा श्रीमती उषा बर्वे यांची नियुक्ती दिनांक ०१.०९.२०१९ पासून करण्यात आली. श्रीमती उषा बर्वे या सानपाडा प्रकल्पाची स्थापना झाल्यापासूनच तेथे कार्यकर्त्या म्हणून आपले योगदान देत असून सध्या बालिकाश्रमप्रमुख म्हणून काम पहातात.

दि. १५ नोव्हेंबर २०१९ रोजी संस्थेचे कार्यवाह श्री. ग.अ.दामले यांचे दुख:द निधन झाले. तेव्हा त्यांची रिक्त जागा भरण्यासाठी श्री. श्रीकांत जोशी यांची कार्यवाह म्हणून सर्वानुमते नेमणूक केली. श्री. नागनाथ सराफ यांना संस्थेचे कायमस्वरूपी विश्वस्त नेमण्यात आले.

## कार्यकारिणी मंडळ

संस्थेच्या कार्यकारिणीच्या कार्याध्यक्षा श्रीमती उषा बर्वे यांची नियुक्ती संस्थेच्या विश्वस्तपदी करण्यात आली. त्यांच्या रिक्तपदी कार्यकारिणी सदस्या श्रीमती अंजली गद्रे यांची सर्वानुमते कार्याध्यक्षा म्हणून नेमणूक करण्यात आली.

## संस्थेचे लेखापरिक्षक

२०१९ – २० या आर्थिक वर्षात संस्थेच्या लेखापरिक्षणाचे काम मुलुंड येथील **M/s. CVK & Associates** या आस्थापनेकडे दिले आहे.

## ISO प्रमाणपत्र

TUV Austria यांचे ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र संस्थेच्या कांजुरमार्ग येथील पुनर्वसन केंद्र व रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्राला तसेच सानपाडा येथील रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्राला प्राप्त झाले आहे. अहवालसालात दि. २८.११.२०१९ रोजी श्री. विद्याधर अपशंकर यांनी संस्थेच्या कांजुरमार्ग व सानपाडा अशा दोन्ही प्रकल्पांना भेट देऊन लेखापरिक्षण केले.

## वार्षिक तपासणी

१. दि. २३ जून २०१९ रोजी महाराष्ट्र राज्यस्तरीय तपासणी समितीच्या ॲड. श्रीमती अनीता विपत, श्रीमती शैला जंगम आणि श्री. लक्ष्मण दानावडे यांनी संस्थेला भेट दिली.
२. दि. ३० ऑगस्ट २०१९ रोजी श्री. विनोद भोसले, DCPU मुंबई उपनगर जिल्हा, चेंबूर यांनी संस्थेला भेट दिली.
३. दि. २३ सप्टेंबर २०१९ रोजी जिल्हा बाल कल्याण समितीचे अध्यक्ष श्री. शंकर जाधव यांनी संस्थेची तपासणी केली.
४. दि. ११ डिसेंबर २०१९ रोजी जिल्हा महिला बाल विकास, चेंबूरच्या पर्यवेक्षिका अधिकारी (PO) श्रीमती शैला जंगम यांनी संस्थेची तपासणी केली.
५. दि. २६ डिसेंबर २०१९ रोजी उपजिल्हाधिकारी अतिक्रमण विभाग, नायब – तहसिलदार यांनी संस्थेला भेट दिली.
६. दि. ७ व दि. ८ जानेवारी २०२० रोजी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, चेंबूर येथील संरक्षण अधिकारी श्रीमती प्रतिभा पाटील व पर्यवेक्षिका अधिकारी श्रीमती शैला जंगम यांनी संस्थेची तपासणी केली.

७. दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी राष्ट्रीय बालहक्क आयोग, नवी दिल्ली यांच्यातर्फे तपासणी करण्यात आली. त्यावेळी (१) जिल्हा महिला बाल विकास, चेंबूरच्या पर्यवेक्षिका अधिकारी श्रीमती शैला जंगम, (२) बाल कल्याण समितीचे अध्यक्ष श्री. शंकर जाधव, (३) जिल्हा तपासणी समिती उपनगरचे श्री. गणेश चौधरी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिका-यांनी वेळोवेळी दिलेल्या उत्तम सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने मी आभार मानतो.

## वार्षिक मेळावा

सालाबादप्रमाणे दि. २३.११.२०१९ रोजी संस्थेचा मेळावा दादर येथील राजा शिवाजी विद्यालयाच्या बी.एन. वैद्य सभागृह येथे करण्याचे नियोजित केला होता. परंतु दि. १५ नोव्हेंबर रोजी श्री. दामलेकाकांचे दुख:द निधन झाल्यामुळे पूर्वनियोजित कार्यक्रम आयोजित केला गेला, परंतु मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले नाहीत. सुप्रसिद्ध गायक व संगीतकार श्री. श्रीधरजी फडके यांचा गाण्यांचा कार्यक्रम तेवढा आयोजित केला गेला. श्री. श्रीधरजी फडके यांनी अतिशय सुरेल श्रवणीय गाणी मुलाखतीवजा कार्यक्रमातून सादर केली. श्रीमती श्रेयसी वझे यांनी श्री. फडके यांची मुलाखत घेतली. त्यानंतर कै. श्री. दामलेकाकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. संस्थेचे कार्यकर्ते, हितचिंतक, कर्मचारी, देणगीदार यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. दामलेकाकांच्या आठवणी पुन्हा हृदय हेलावून गेल्या.








## माजी विश्वस्तांचे संमेलन

दि. १४ डिसेंबर २०१९ रोजी संस्थेच्या माजी विश्वस्तांचे एक संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात संस्थेची एकंदर प्रगती, वाटचाल यासंबधी चर्चा करण्यात आली. संस्थेचे सध्या सुरु असलेले यशस्वी उपक्रम व मनात असलेल्या नवनवीन कल्पना याबाबतची या अनुभवी दिग्गज्जांची मते जाणून घेणे हा यामागचा खरा हेतू. तसेच याबाबतीतील त्यांचे काही विचार, सूचना यांचाही सर्वानुमते आढावा घेण्यात आला. संस्थेत कार्यरत असलेले (१) श्री. अविनाश पेडणेकर – संगणक शिक्षक, कांजुरमार्ग आणि (२) श्रीमती लक्ष्मी देसाई – सुपरवायजर, बालिकाश्रम, सानपाडा यांना त्यांच्या संस्थेसाठीच्या उत्तम योगदानासाठी सर्वोत्कृष्ट कर्मचारी म्हणून गौरवण्यात आले.



## प्रशासन

'वात्सल्य ट्रस्ट' चे ११ विश्वस्त आहेत. त्यापैकी ३ कायमस्वरूपी व ८ बदलत्या स्वरुपात आहेत. बदलत्या स्वरूपातील विश्वस्तांची मुदत ६ वर्ष आहे. मात्र दर ३ वर्षांनी ४ विश्वस्त ज्यांचा ६ वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे ते निवृत्त होतात. विश्वस्तांची बैठक दर ३ महिन्यांनी तर कार्यकारिणी मंडळाची बैठक दर महिन्याला घेतली जाते. त्याखेरीज विश्वस्त वेळोवेळी सभा घेवून महत्वाच्या विषयांवर चर्चा करतात व निर्णय घेतात. विश्वस्तांच्या बैठकीत महत्वाच्या गोष्टींचं निवेदन केलं जातं व आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सभेच्या इतिवृत्तांची नोंद ठेवली जाते. संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार संस्थेच्या कामाची दिशा संस्थेच्या विश्वस्तांकडून ठरवली जाते. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य संस्थेच्या देनंदिन कामकाजाचं आयोजन करतात व त्यावर देखरेख करतात.

'वात्सल्य' चे विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य कुठल्याही प्रकारचे मानधन घेत नाहीत. आजपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचा अथवा सदस्याचा परदेश दौ-याचा खर्च संस्थेने केलेला नाही.

## आस्थापनावरील खर्च

| कर्मचारी | महिला | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| दरमहा रु. १०,०००/- पर्यंत | 90 | 11 | 101 |
| दरमहा रु. १०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत | 58 | 5 | 63 |
| दरमहा रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत | 5 | - | 5 |
| दरमहा रु. ३०,००१/- पेक्षा जास्त | 1 | - | 1 |
| एकूण | | | १७० |

# कांजुरमार्ग

### अर्भकालय

'वात्सल्य ट्रस्ट' मध्ये २०१९-२० या वर्षात **३१** मुलं दाखल झाली. यापैकी **३** मुले तात्पुरत्या निवाऱ्यासाठी दाखल करण्यात आली होती. अहवालसालात संस्थेने **२८** मुलांना कायदेशीर बाबी पूर्ण करून नवीन कुटुंबं मिळवून दिली आहेत. यापैकी **५** मुलांचे परदेशी कुटुंबात पुनर्वसन करून दिले आहे.
संस्थेच्या सुरुवातीच्या काळापासून आजमितीपर्यंत एकूण **११८८** मुलांना संस्थेने दत्तक पालक मिळवून दिले आहेत. सर्व दत्तक मुलांची प्रगती समाधानकारक आहे हे सांगायला मला विशेष अभिमान वाटतो.
संस्थेत सध्या **३३** अर्भके आणि **८** विशेष मुले अशी एकूण **४१** मुले वास्तव्यास आहेत. त्याखेरीज **६** मुले इतर संस्थांमध्ये शिक्षण व विशेष देखभालीसाठी दाखल करण्यात आली आहेत.

वात्सल्यमध्ये अगदी एक दिवसापासुनची तान्ही बाळे दाखल केली जातात. ही अर्भके बहुतेक आजारी अवस्थेत संस्थेत आणली जातात. ती अशक्त, कमी वजनाची व कूपोषितही असतात. त्यामुळे त्यांना अधिक आजारपण येण्याची संभावना जास्त असते. वात्सल्यच्या सेवाभावाने काम करणाऱ्या सेविका, परिचारिका आणि पर्यवेक्षिका अथक प्रयत्नाने ह्या मुलांचे पालनपोषण करतात. सेविका आईच्या मायेने त्यांचे संगोपन करतात. संस्थेतील प्रत्येक बाळासाठी एक सेविका आईची भूमिका पार पाडते आणि त्यामुळे बाळ दत्तक जाईपर्यंत आई आणि बाळाचे एक सुंदर वात्सल्यमय नाते गुंफले जाते. अनेकदा बाळ दत्तक गेल्यानंतरही दत्तक पालक आवर्जून बाळांना संस्थेत प्रत्यक्ष आणून त्यांच्या ह्या वात्साल्यतील आईची भेट घालून देतात, त्यावेळी त्यांच्या मुखावरील कृतार्थ भाव मनाला सुखावून जातो. कर्मचाऱ्यांच्या ह्या मानवतापूर्ण कार्याचा 'वात्सल्य' ऋणी आहे.






## पुनर्वसन केंद्र



वात्सल्यच्या पुनर्वसन केंद्रातर्फे विशेष गरजा असलेल्या मुलांना सामान्य प्रवाहात आणण्याचा व समाविष्ट होण्याचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला जातो. आकार विभागात फिझियो थेरपी, ऑक्यूपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, स्पेशल एज्युकेशन इत्यादी सुविधा मुलांना पुरविल्या जातात. ख़ुशी विभागात मुलांच्या भावनिक, वर्तणूकीय व शैक्षणिक समस्यांवर उपाययोजना केली जाते. यात मुलांसाठी तसेच पालकांसाठी व कुटुंबासाठी थेरपी, मानसोपचार तज्ज्ञांची मदत, समुपदेशन इत्यादीचा समावेश असतो. 'दिशा' उपक्रमाद्वारे पुनर्वसन साहित्य व सामुग्री गरजू मुलांना पुरविली जाते ज्यायोगे त्यांचे जीवन सुकर होते.

**कांजूरमार्ग** येथे २००५ साली सुरु झालेल्या पुनर्वसन केंद्रात आतापर्यंत **२०००** हून अधिक विशेष मुलांनी उपचाराचा लाभ घेतला. दर आठवड्याला सुमारे **१२५** मुलांवर ह्या केंद्रात विविध थेरपी देण्यात येते. ह्या वर्षी वात्सल्यच्या कांजुरमार्ग, सानपाडा व अलिबाग शाखांमध्ये **२००** हून अधिक मुलांवर नियमित उपचार करण्यात आले. '**दिशा**'

उपक्रमांतर्गत **१००** हून अधिक मुलांना पुनर्वसन साहित्य व सामुग्री जसे श्रवणयंत्रे, ओर्थोसीस, स्प्लिंट वगैरे पुरविण्यात आली. पुनर्वसन केंद्रातर्फे मुलांच्या पालकांना तसेच शाळेतील व घरातील इतर व्यक्तींना मुलांची योग्य देखभाल करण्याचे प्रशिक्षण दिले जाते ज्यामुळे मुलांची प्रगती योग्यरीतीने व सातत्याने होते. कांजुरमार्ग येथे पूर्वऔद्योगिक प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे तीन कार्यशाळा, खेळांच्या स्पर्धा, विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, दिवाळीच्या निमित्ताने कार्यक्रम घेण्यात आले. त्याचबरोबर गुरुपौर्णिमा, बालदिन व ख्रिसमस हे सणही मुलांनी साजरे केले.

जास्तीत जास्त मुलांना वात्सल्यच्या सेवेचा फायदा घेता यावा ह्या हेतूने 'दिशा' ह्या 'आउटरिच' उपक्रमांतर्गत इतर सेवाभावी संस्थांशी समन्वय साधून तसेच पुनर्वसन क्षेत्रातील विविध तज्ज्ञ मंडळींच्या सहकार्याने वेळोवेळी मेळावे घेण्यात येतात. ह्यावर्षी एकूण असे ६ ओर्थोसीस मेळावे घेण्यात आले व त्यापैकि ३ कांजूर येथे घेतले गेले, ज्याचा लाभ **३७** मुलांनी घेतला. सदर मेळाव्यांत ओर्थोसीस साहित्याचे व स्प्लिंटचे वाटप करण्यात आले. जेष्ठ ओर्थोसीस व प्रोस्थोसीस तज्ज्ञ श्री. उमेश राजे यांच्या अथक परिश्रमामुळे सदरचे मेळावे यशस्वी झाले.

त्याचप्रमाणे दि. १७.०१.२०२० रोजी वाय. एम. टी. दन्तचिकित्सा महाविद्यालय व इस्पितळ यांच्या सहकार्याने घेतलेल्या दंतचिकित्सा मेळाव्याचा लाभ **७०** विशेष मुलांनी घेतला.

**सानपाडा** येथील पुनर्वसन केंद्र २०१६ साली सुरु करण्यात आले. केंद्राच्या उद्‌घाटनापासूनच तेरणा मेडीकल कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी डॉक्टरांकडून वरिष्ठ नागरिकांना फ़िजिओथेरपी देण्यात येते. नव्या मुंबईतील अनेक वरिष्ठ नागरिकांनी ह्या सेवेचा लाभ घेतला आहे. लहान विशेष मुलांसाठी सुरु करण्यात आलेल्या पुनर्वसन केंद्राचा लाभ यावर्षी **३०** मुलांनी घेतला. दिनांक २६.०८.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या ओर्थोसीस मेळाव्यात **४** मुलांना ओर्थोसीस साहित्याचे वाटप करण्यात आले.

**अलिबाग** येथील पुनर्वसन केंद्राचा लाभ यावर्षी **७०** मुलांनी घेतला. दिनांक ०८.०८.२०१९ रोजी अलिबाग येथे व दिनांक १९.११.२०१९ रोजी श्रीवर्धन येथे घेण्यात आलेल्या ओर्थोसीस मेळाव्यात **१७** मुलांना ओर्थोसीस साहित्याचे व स्प्लिंटचे वाटप करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील माणगाव, पोलादपूर व अलिबाग येथे ५ वैद्यकीय मेळावे कर्णबधीर मुलांसाठी आयोजण्यात आले होते. एकूण ४२ मुलांची श्रवण क्षमतेची चाचणी करून ३८ मुलांना श्रवण यंत्रे देण्यात आली तर उर्वरीत ४ मुलांना अधिक चाचणी व उपचारांसाठी श्रवणतज्ञांकडे पाठवण्यात आले. माणगाव येथे सार्वजनिक आरोग्य केंद्राचे डॉ. श्री. ढवळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. ऋषिकेश देशमुख यांच्या मोलाच्या सहभागामुळे सर्व मेळाव्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला व मुलांना त्याचा अत्यंत फायदा झाला.

जीवन संवर्धन, टिटवाळा व दिव्य विद्यालय, जव्हार ह्या दोन सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने अनुक्रमे दिनांक ३०.०४.२०१९ आणि ०२.०५.२०१९ रोजी दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते व त्यात विशेष मुलांना शिकविताना शिक्षकांना येणाऱ्या समस्यांवर तज्ञांनी चर्चा केली.

वनिता समाज, दादर येथे ११ जानेवारी २०२० रोजी भरविलेल्या प्रदर्शनात पूर्वऔद्योगिक प्रशिक्षण वर्गांतील विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सुंदर वस्तूंची विक्री केली गेली.



## रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र

वात्सल्यचा रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र सुरु होवून १३ वर्षे झाली. स्थानिक व महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रहिवाशी मुली अशा एकूण **६५** मुलींनी यावर्षी सदर वर्षभराच्या प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेतला. डॉ. ज्योती जाधव, डॉ. अलका बेडेकर, श्रीमती. मीनल नार्वेकर आणि श्रीमती रोहिणी डोंगरे यांच्या तज्ञ मार्गदर्शना खाली अभ्यासक्रम पूर्ण केला गेला. विद्यार्थिनींना हिरामोंगी हॉस्पिटल, मुलुंड व गणात्रा हॉस्पिटलमध्ये प्रात्यक्षिकांचा अभ्यास करण्याची संधी दिल्याबद्दल मी दोन्ही हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाचा आभारी आहे. वात्सल्यतर्फे ह्या विद्यार्थीनीना इंग्रजी संभाषणकलेचे शिक्षण तसेच संगणकाचे उपयुक्त ज्ञानही दिले जाते ज्यायोगे त्यांना नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होतात व आधुनिक इस्पितळांच्या वातावरणात सहजरित्या रुळतात.



**वाळवंडा केंद्र** : पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील 'माऊली शिक्षण प्रसारक मंडळ' वाळवंडा येथे यावर्षीपासून वात्सल्यने **३४** विद्यार्थिनींच्या प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. आनंदीबाई आश्रमशाळेत घेण्यात येणाऱ्या या प्रशिक्षणाचा सर्व खर्च तसेच विद्यार्थिनींच्या नोंदणी शुल्कापासून लेखनसामुग्री, प्रयोगशाळेतील साहित्य यांचा पुरवठा, त्याचप्रमाणे त्यांना लागणाऱ्या अन्नधान्याची सर्व व्यवस्था वात्सल्यतर्फे करण्यात येते.

आर. पी. जि. ग्रुपच्या 'संजीवनी' प्रकल्पांतर्गत गेली ५ वर्षे वात्सल्यच्या रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्राला आर्थिक सहाय्य मिळत आहे. त्यांच्या ह्या मोलाच्या मदतीने गरीब कुटुंबातील व ग्रामीण भागातील होतकरू मुलींना शिक्षणाची व रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

## संगणक प्रशिक्षण वर्ग

वात्सल्यचे संगणक प्रशिक्षण वर्ग २००६ सालापासून सुरु असून त्यात दरवर्षी समाधानकारक प्रगती व वाढ होत आहे. अहवालसालात कांजूर, भांडूप, सानपाडा व तुर्भे येथे संगणक प्रशिक्षण वर्ग चालविले गेले. सदर संगणक प्रशिक्षण वर्गांचा आर्थिक भार लार्सन अंड टुब्रो इन्फोटेक लि. (LTI) यांनी त्यांच्या कंपन्यांचे सामाजिक दायित्व (CSR) अंतर्गत पुरस्कृत केला.

आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्या घटकांतील मुलांना व तरुणांना संगणक प्रशिक्षणाद्वारे सक्षम करण्याच्या हेतूने सुरु केलेले वात्सल्यचे संगणक प्रशिक्षण वर्ग चांगलेच लोकोपयोगी कार्य करत आहे. MKCL चे MSCIT, KLiC, टॅलि / जीएसटी व बेसिक इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश संगणक प्रशिक्षण कार्यक्रमात आहे. कांजूर व सानपाड्यातील प्रशिक्षणार्थीबरोबर भांडूप येथील गरीब मुला मुलींना तसेच तुर्भे येथील शिक्षणाची परवड झालेल्या मुस्लिम समाजातील मुलींना संगणक प्रशिक्षणाद्वारे ज्ञानाची व रोजगाराची द्वारे खुली करण्यात आली. विशेष म्हणजे **३** तृतीयपंथी तरुणींनीही संगणक प्रशिक्षण पूर्ण करून रोजगार प्राप्त केला. एकूण **४३२** मुलींनी व **२४७** मुलांनी संगणक प्रशिक्षण पूर्ण केले व त्यापैकी **५१५** जणांना रोजगार प्राप्त झाला.




LTI च्या ६७५ कर्मचाऱ्यांनी सेवा कार्यकर्ते म्हणून योगदान दिले. त्यांनी ४८ कार्यशाळा घेवून संगणक वर्गातील विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, संभाषण कला, नेतृत्व, मुलाखती इत्यादी उत्तम रोजगार प्राप्त करण्यास आवश्यक असणाऱ्या विषयांवर प्रशिक्षण दिले. नोव्हेंबर महिन्यात LTI च्या ४६ कर्मचाऱ्यांनी संगणक साक्षरतेच्या प्रसाराबरोबरच वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित केले. महापे येथील नवी मुंबई नगर पालिकेच्या शाळा क्र. ४० च्या एकूण **४१६** विद्यार्थ्यांनी अद्ययावत संगणक केंद्राचा लाभ घेतला. LTI च्या १४७ कर्मचाऱ्यांनी सेवा कार्यकर्ते म्हणून योगदान दिले. तसेच मुलांच्या पालकांसाठीही ५० संगणक साक्षरतेचे वर्ग घेण्यात आले.

## मान्यवरांच्या भेटी

विविध दाते, हितचिंतक, महिला मंडळांचे सदस्य, लायन्स क्लब व इतर क्लब्स वेळोवेळी वात्सल्यला भेटी देऊन मुलांची व रहिवाश्यांची विचारपूस करतात व देणग्याही देतात. आपण सर्वांनी वात्सल्यला दिलेल्या आधारामुळेच संस्थेचा गाडा सुरळीत चालू आहे.
नावाजलेल्या कंपन्यांमध्ये उच्चपदस्थ असलेले क्लब्सचे सदस्य विविध भाषिक व प्रांतिक असतात पण प्रेमाची व करुणेची वैश्विक भाषा सर्वाना एकत्र करते. संस्थेतील मुलांवर त्यांचे आशीर्वाद सदैव राहोत.
अहवालसालात खालील लायन्स क्लब व इतर क्लब्सच्या सदस्यांनी वात्सल्यला भेटी दिल्या.

१. **रोटरी क्लब ऑफ पवई**
२. **रोटरी क्लब ऑफ मुलुंड साउथ**
३. **रोट्रॅक्ट क्लब ऑफ ठाणे**
४. **इनरव्हील क्लब ऑफ मुलुंड**
५. **इनरव्हील क्लब ऑफ घाटकोपर**
६. **इनरव्हील क्लब ऑफ ठाणे**
७. **लायन्स क्लब ऑफ बॉंबे**

## निधी संकलन

संस्थेचा आर्थिक डोलारा हा आपल्यासारख्या हितचिंतकांच्या औदार्यामुळेच उभा रहातो. कै. ग.अ.दामले, कै. ना. स. उर्फ नाना भागवत, कै. कुसुमताई उपाध्ये, कै. वसंत उर्फ दादा भागवत, कै. दतात्रय डबीर अशा एकापेक्षा एक करुणामयी व्यक्तींच्या पुण्याईमुळे संस्थेला एक उत्तम संस्थेचा दर्जा प्राप्त झाला आहे. दैवयोगाने पुढील पिढीही संस्थेला अधिकाधिक वृद्धिंगत करण्याचे मानस ठेऊन आहे. याला आपल्यासारख्या दात्यांची जोड मिळाल्यास तो दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. संस्थेवर भरभरून प्रेम करणा-या आपणासारख्या दानशूर देणगीदारांचा मी मनापासून आभारी आहे. आपण दिलेल्या निधीचा विनियोग हा सद्कारणी केला जाईल असा आपला संस्थेवर विश्वास आहे आणि या आपल्या विश्वासावरच हा जगन्नाथाचा रथ ओढावयाचे बळ वेळोवेळी संस्थेला मिळत असते.

संस्थेची अहवालसालातील आर्थिक परिस्थिती समाधानकारक आहे. हस्ते परहस्ते वैयक्तिकरित्या दिलेल्या सर्व देणगीदारांना संस्थेतर्फे धन्यवाद. प्रत्येक देणगीदार मग तो लहानात लहान निधी देणारा का असेना, संस्थेसाठी तो

महत्वाचाच आहे. परंतु कागद व छपाईचे वाढलेले दर लक्षात घेता अहवालसालात रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त निधी दिलेल्या देणगीदारांची नावेच छापत आहोत याची कृपया नोंद घ्यावी.

## <u>अहवालसालातील काही प्रमुख देणग्या</u>

श्री. मारीवाला किशोर, मुंबई - रु. २५,००,०००/-
श्री. गर्ग विपिनकुमार, दिल्ली – रु. ३,००,०००/-
श्रीमहालक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्ट, महालक्ष्मी – रु. २,००,०००/-
श्री. शेख सादिक फैसुद्दिन, भाईंदर – रु. २,००,०००/-
पवार पब्लिक स्कूल, भांडूप – रु. १,५०,०००/-
श्री. गद्रे सुनील, डोंबिवली – रु. १,५०,०००/-

**<u>रु. १,००,०००/- प्रत्येकी</u>**
श्रीमती आजगांवकर अनघा – ठाणे, श्री. मराठे प्रभाकर – सांताक्रूझ, श्री. परांजपे शेखर – विलेपार्ले, श्री. परांजपे सुरेश – दादर, श्री. रिन्दानी सौरभ – अहमदाबाद, सोशल विंग राईट – सानपाडा, श्री. शेणॉय नित्यानंद – ठाणे

**<u>रु. ७६,०००/-</u>**
श्रीमती रेखी पल्लवी – नेरूळ
**<u>रु. ७५.५००/-</u>**
श्री. मेहेरोत्रा सुदिप – लोअर परेल
**<u>रु. ७५,०००/- प्रत्येकी</u>**
श्री. घुर्ये अनंत रामनाथ - ठाणे, दि. असोसिएटेड ऑटोपार्टस् प्रा.लि. – गिरगांव

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे परिशिष्ट **‘अ’** मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

# <u>कायम ठेव योजना</u>

कायम ठेव योजनेअंतर्गत मिळालेल्या देणग्यांची रक्कम सरकारी रोखे किंवा राष्ट्रीयकृत बँका यांत गुंतवली जाते. या रकमेतून मिळणाऱ्या व्याजाचा विनियोग देणगीदाराच्या सूचनेनुसार त्याच्या कुटुंबातील आप्तांच्या स्मरणार्थ / जन्मदिवसाप्रीत्यर्थ अथवा वाढदिवसाप्रीत्यर्थ एखाद्या विशिष्ट दिवशी संस्थेतील निवासी मुलांना दुध / खाऊ इ. देण्यासाठी केला जातो. त्यासंबंधी देणगीदाराला संस्थेकडून पत्राद्वारे कळवले जाते. जेणेकरून देणगीदारांशी संस्थेचा ऋणानुबंध कायम राहतो. या योजनेअंतर्गत एकच देणगीदार निरनिराळ्या कारणासाठी व निरनिराळ्या दिवसासाठीही देणगी देऊ शकतो.

## <u>अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे</u>

**<u>रु. १,००,०००/- प्रत्येकी</u>**
श्री. देशमुख सुरेश – माहीम, श्रीमती जोशी आशा शंकर – पुणे, श्रीमती कामत सुमेधा – कांदिवली, श्री. महाजन सुबोध – ठाणे, मे. विनायक जोशी आणि कं.- ठाणे

**<u>रु. ८८,००१/-</u>**

श्री. व्यवहारे पराग - ठाणे

**<u>रु. ७९,०००/-</u>**

मे. व्हिजन कॉर्पोरेशन – शिवडी

**<u>रु. ७५,०००/-</u>**

श्री. पालेकर महाबळेश्वर – अंधेरी

रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी दिलेल्या देणगीदारांची नावे परिशिष्ट **'ब'** मध्ये दिली आहेत. सर्व देणगीदारांचे खूप खूप आभार !

## आर्थिक दत्तक योजना

या योजनेअंतर्गत काही देणगीदार आपल्या मासिक वेतनातून एखादी ठराविक रक्कम 'वात्सल्य' मधील बालकांच्या संगोपन व शिक्षणासाठी देण्गीस्वरुपात देतात. ही रक्कम देणगीदार आपल्या सोयीनुसार एकरकमी किंवा ह्फ्त्यानेही देऊ शकतात.

दुसरा पर्याय म्हणजे काही देणगीदार एखाद्या अर्भकाच्या दुधाचा / जेवणाचा अथवा शाळेत जाणा-या एखाद्या मुला / मुलीच्या शिक्षणाचा वार्षिक खर्च देतात. यासंबंधीचा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| एका अर्भकाचा एका महिन्याचा दुधाचा खर्च | - | रु. १,०००/- |
| एका अर्भकाचा एका वर्षाचा दुधाचा खर्च | - | रु. १२,०००/- |
| एका मुलाचा एका महिन्याचा जेवणाचा खर्च | - | रु. १,५००/- |
| एका मुलाचा एका वर्षाचा जेवणाचा खर्च | - | रु. १८,०००/- |
| एका मुलाचा एका महिन्याचा शिक्षणाचा खर्च | - | रु. १,८००/- |
| एका मुलाचा एका वर्षाचा शिक्षणाचा खर्च | - | रु. १०,०००/- |
| एका मुलाचा एका वर्षाचा सर्व खर्च | - | रु. २५,०००/- |

**अहवालसालात मिळालेल्या काही प्रमुख देणग्या खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| श्री. कुलकर्णी मंदार, ठाणे | - | रु. २,२४,०००/- |
| श्री. चोणकर प्रफुल्ल, मालाड | - | रु. १,२७,०००/- |
| श्री. हल्लूर अनंत, ठाणे | - | रु. १,२०,०००/- |
| श्री. कुलकर्णी निलेश - डोंबिवली | - | रु. १,००,०००/- |
| श्री. टटारिया मोहन आणि प्रग्या, मुलुंड | - | रु. ९२,६१५/- |
| श्रीमती तांडेल पूनम, भांडूप | - | रु. ९०,०००/- |

## दिवाळी भेट कुपन्स योजना

दिवाळी भेट कुपन्स ही योजना देणगीदारांमध्ये सर्वात लोकप्रिय योजना आहे. दिवाळीच्या सुमारास संस्था रु. १०/-, रु. ५०/-, रु. १००/- अशा लहान रकमांची कुपन्स छापते व विविध कार्यालयात काम करणा-या संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून अथवा शाळांमधून या कुपन्सची विक्री केली जाते. रक्कम छोटी असल्याकारणाने या योजनेअंतर्गत संस्थेला बरीच मदत मिळते. संस्थेचा प्रचारही यामार्फत मोठ्या प्रमाणावर होतो.

## शाळांचा आर्थिक सहभाग

दिवाळी सणाच्या दिवसात उडवल्या जाणा-या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण व हवेचं प्रदूषण होतं ही बाब विद्यार्थ्यांच्या मनावर शाळेतील शिक्षक बिंबवतात. आणि हा पैसा वाया घालवण्यापेक्षा सत्कारणी लावल्यास एक प्रकारचे आत्मिक समाधान कसे मिळते याचीही विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली जाते. यासाठी शालेय मुलांच्या पालकसभेला किंवा वार्षिक समारंभाला संस्थेचे कार्यकर्ते शाळा-शाळांमध्ये जाऊन संस्थेबद्दल प्रचार करतात. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या मनामध्ये दिवाळीला फटाके न उडवता तो पैसा एखाद्या समाजोपयोगी कार्यासाठी देण्याची वृत्ती उत्पन्न होते. एक सकारत्मक दृष्टीकोन पुढील पिढीत उपजण्यास मदत होते. 'थेंबे थेंबे तळे साचे' या गोष्टीचे महत्वही याद्वारे स्पष्ट होते.

विद्यार्थ्यांकडून जमवलेली रक्कम शाळेमार्फत संस्थेला दिली जाते. या शाळांनी इतर शाळांसमोरही चांगला आदर्श ठेवला आहे. अशा प्रकारच्या निधी संकलनास मदत करणा-या शाळांचे मी वात्सल्यतर्फे खूप खूप आभार मानतो.

**शाळांची नावे खालीलप्रमाणे**

- **ठाणे** : सरस्वती सेकंडरी स्कूल (प्राथमिक व माध्यमिक विभाग), ए. के. जोशी हायस्कूल (प्राथमिक व माध्यमिक विभाग)
- **विलेपार्ले** : पार्ले टिळक विद्यालय – प्राथमिक व माध्यमिक विभाग (मराठी व इंग्रजी माध्यम), माधवराव भागवत हायस्कूल महिला संघ – प्राथमिक व माध्यमिक विभाग (मराठी व इंग्रजी माध्यम), ओरियन स्कूल
- **मालाड** : उत्कर्ष मंडळ विद्यामंदिर (पूर्व व पश्चिम) प्राथमिक व माध्यमिक विभाग, नागरी निवारा विद्यामंदिर
- **बोरीवली** : सुविद्या प्रसारक संघ यांचे (१) सुविद्यालय – परांजपे नगर, (२) म.ह. चोगले विद्यालय गोराई, (३) मुंबादेवी विद्यानिकेतन – गोराई, (४) मनुभाई दत्ताणी – मागाठाणे जीवन बिमानागर हायस्कूल, (५) शिक्षण प्रसारक मंडळचे विद्यामंदिर दहिसर (प्राथमिक विभाग मराठी व इंग्रजी माध्यम) -

## परदेशस्थ देणग्या

अमेरिकेत इंडिया डेव्हलपमेन्ट अँड रिलीफ फंड (India Development And Relief Fund) आणि महाराष्ट्र फाउंडेशन (Maharashtra Foundation – New York) या दोन संस्था कार्यरत आहेत. अनिवासी भारतीयांनी यापैकी कोणत्याही संस्थांच्या माध्यमातून देणगी दिल्यास त्यांना अमेरिकेतील टॅक्सच्या नियमाप्रमाणे आयकरांत सवलत मिळू शकते. तेव्हा अनिवासी भारतीयांसाठी ही एक पर्वणी ठरू शकते. जेणेकरून आयकरांतील सवलतीसोबतच अनिवासी भारतीय आपल्या देशातील गरजूंना मदतही करू शकतील. यासाठी अनिवासी भारतीयांना या संस्थांच्या माध्यमातून 'वात्सल्य' ला देणगी देऊन सहाय्य करावं हि विनंती.

अहवालसालात भारतीय चलनाप्रमाणे इंडिया डेव्हलपमेन्ट अँड रिलीफ फंडच्या माध्यमातून रु. ११,२६,४००/– इतकी रक्कम संस्थेला देणगी म्हणुन मिळाली आहे.

अहवालसालात श्री. नगरकर राजेश, ऑस्ट्रेलिया यांच्याकडून रु. २,७४,४५०/– इतकी रक्कम देणगीस्वरुपात आली आहे.

## वस्तुरूप देणग्या

आर्थिक मदतीप्रमाणेच संस्थेला वस्तुरुपातील सहाय्य देणारे देणगीदारही पुष्कळ आहेत. या देणग्यांमुळे 'वात्सल्य' चा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी व्हायला मदत होते.

याबाबत सर्व हितचिंतक / देणगीदार यांना नम्र विनंती आहे की, कांजूर येथील संस्थेतील निवासी बरीचशी मुलं ही पाळण्यातील आहेत. त्यामुळे देणगीदारांनी आणलेले मिठाई, चॉकलेट, विविध बेकरी उत्पादनं इ. नाशिवंत पदार्थ यांचा त्यांना उपयोग नाही. अशा वस्तू साठवूनही ठेवता येत नाहीत. तेव्हा कृपया आपण वर उल्लेखलेल्या वस्तू आणू नयेत. तसेच लहान बाळांचे / मुलामुलींचे नवीन / जुने वापरलेले कपडे अथवा खेळणी आणू नयेत. त्याऐवजी अंघोळीचा साबण, कपड्याचा साबण, डेटॉल, फिनाईल, सॅनिटायझर, लिक्विड सोप, साबण पावडर, भांडी घासण्याचा साबण, सुका खाऊ, धान्ये, दुधपावडर या वस्तू देणगीच्या स्वरुपात द्याव्यात. तसेच काही वस्तू देणगी म्हणुन द्यावयाच्या असल्यास संस्थेला ज्या गोष्टींची अधिक निकड आहे त्याची यादी संस्थेतून दूरध्वनीद्वारे घ्यावी. जेणेकरून आपण आणलेल्या वस्तू योग्यरीतीने वापरांत येतील व संस्थेची गरजही भागवली जाईल.

१. मुंबई गोरक्षक मंडळ, कांदिवली गेली बरीच वर्षे संस्थेतील सर्व निवासी मुलांसाठी दरमहा मोठ्या प्रमाणावर दुधपावडर देणगीच्या स्वरुपात देत आहेत. मुंबई गोरक्षक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो.
२. श्री. जितेंद्र जग्गी आणि श्री. शौर्य जग्गी, चेंबूर हे आठवड्याची सर्व प्रकारची भाजी संस्थेत आणून देतात.
३. श्री. सुमित कानुगो, कांजुरमार्ग हे दरदिवशी ५ लिटर दुध संस्थेतील अर्भकांसाठी देतात. करोनाच्या प्रादुर्भावाच्या कालावधीत सुद्धा ह्यात त्यांनी खंड पडू दिला नाही हे विशेष. त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत.

४. आपले एक नियमित देणगीदार श्री. हेमंत शिरोळकर व सौ. सायली शिरोळकर दरवर्षी दिवाळी सणानिमित्त मुलांना कपडे व इतर उपयोगी वस्तू देणगीस्वरुपात देत असतात. यावर्षीही दिवाळीला त्यांनी मुलांना छान छान कपडे व धान्यस्वरुपात देणगी दिली.
५. श्री. निलेश सावंत व श्री. शशिकांत निखांग्रे यांचेही नाव मी या अहवालाच्या निमित्ताने नमूद करेन. कुठलीही गोष्ट संस्थेला गरजेची असल्यास यांना केवळ एका दूरध्वनीद्वारे सांगितली की दुस-या दिवशी ती वस्तू ते तात्काळ हजर करतात.
६. COVID 19 च्या लॅाकडाऊनच्या काळात घरात बसून राहायचे, बाहेर जाणे टाळायचे म्हुणुन घरातील कामे आटोपल्यावर रिकामा वेळ सत्कारणी लावत श्रीमती वृंदा निजसुरे – वय ८५ वर्षे व श्रीमती हेमा नाडकर्णी – वय ८२ वर्षे या दोघींनी घरातील जुन्या स्वच्छ कपड्यांपासून लहान मुलांसाठी अंगडी, टोपरी, दुपटी, स्वेटर्स शिवले. वात्सल्यला यापूर्वीही या दोघींनी स्वत: शिवलेल्या कपड्यांची मदत देणगी म्हणून दिलेली आहे. प्रसंगी त्यांनी स्वत: शिवलेल्या कपड्यांचे प्रदर्शन भरवून आलेल्या रकमेची देणगी इतर संस्थांनाही दिली आहे. नोकरीतून व संसारातून मुक्त झाल्यावर रिकामेपण घालवण्यासाठी या दोन बहिणींनी वेळेचा सदुपयोग करून समाजासमोर एक आदर्श ठेवला की मनात इच्छा असेल तर समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी वयाची अट नसते.
यासारख्या अनेक वात्सल्यप्रेमींच्या सहकार्याने हा जगन्नाथाचा रथ पुढे सरकत आहे.
वरील सर्वांच्याप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो.

## अहवालसालातील काही वस्तुरूप देणग्या

सुकुमा एक्सपोर्ट लि. यांनी धान्यस्वरुपात देणगी दिली.
श्रीमती अंजू पारेख यांनी मोठा रेफ्रिजरेटर दिला.
इनरव्हिल क्लब ऑफ मुंलुंड यांनी वॅाशिंग मशीन दिली.
श्रीमती सीता मेहरोत्रा यांनी संस्थेला सोन्याची चेन दिली.
NACIN Mumbai Batch 19-20 Induction Course यांनी वॅाशिंग मशीन दिली.
लेकसाईड इन्फोटेक प्रायव्हेट लि. यांनी निर्जंतुकीकरणाच्या सामानाची देणगी दिली.
श्री पियुष जैन यांनी मोठ्या प्रमाणात अर्भकांच्या दुधपावडरची गरज भागवली.
रोटरी क्लब ऑफ मुंबई साऊथ यांनी मुलींसाठी सॅनिटरी नॅपकीन्स दिली.
श्री. चंदर मोहन मल्होत्रा ट्रस्ट यांनी रेफ्रिजरेटर दिला.
नोबेल हायजीन प्रायव्हेट लि. यांनी मोठ्या प्रमाणात डायपर्स दिले.

## सरकारी अनुदान

अहवालसालात संस्थेला मागील वर्षाचे (२०१८-१९) रु. ३,५२,७०५/- आणि (२०१९-२०) या आर्थिक वर्षाचे रु. २,८६,४६४/- इतके अनुदान प्राप्त झाले. सर्व संबंधित अधिका-यांचे मी आभार मानतो.

## कंपन्याचं सामाजिक दायित्व [CSR] व इतर कंपन्या / संस्थांचा सहयोग

केंद्र सरकारने पारित केलेल्या कंपनी कायदा २०१३ यामधील कलम १३५ अन्वये ज्या कंपन्यांचा वार्षिक नफा रु. ५ कोटी अथवा त्याहून अधिक आहे अशा कंपन्यांनी त्यांच्या नफ्यातील २ टक्के इतकी रक्कम सामाजिक बांधिलकीच्या अनुषंगाने समाजोपयोगी कार्य करणा-या संस्थांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी खर्च करावी अशा सूचना दिल्या आहेत. या नियमानुसार अहवालसालात संस्थेला काही प्रथितयश कंपन्यांनी भरघोस आर्थिक सहाय्य दिलं. त्यांचा मी शतश: ऋणी आहे. या कंपन्यांची नावे खालीलप्रमाणे

१. एन.एस.डी.एल. ई - गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीने गेल्या वर्षाप्रमाणेच अहवालसालात संस्थेच्या अर्भकालयासाठी रु. २०,००,०००/- व पुनर्वसन केंद्रासाठी रु. १०,००,०००/- इतकी भरघोस देणगी दिली. या कंपनीचे पदाधिकारी श्री. अजय मुंजे, श्री. विवेक आचार्य, श्रीमती नेहा सामंत, श्रीमती अश्विनी फेणाणी व इतर यांचा मी मनापासून आभारी आहे.
२. एल. अँड टी. इन्फोटेक लि. या कंपनीच्या पवई व महापे (नवी मुंबई) या दोन्ही ठिकाणच्या व्यवस्थापनाने संस्थेच्या कांजुरमार्ग व सानपाडा या दोन्ही प्रकल्पामध्ये चालत असलेल्या संगणक प्रशिक्षण केंद्राला आर्थिक सहाय्य केलं. त्यांच्या 'यस वुई कॅन' उपक्रमांतर्गत आपल्या दोन्ही प्रकल्पांत शिकणा-या उमेदवारांना नोकरीच्या अनुषंगाने व्यक्तिमत्व विकासाबाबत उत्तम मार्गदर्शन केलं. अहवालसालात वरील उपक्रमासाठी संस्थेला या कंपनीने टप्प्याटप्प्याने असे एकूण रु. ७८,७५,१४५/- इतकी भरघोस रक्कम देणगी स्वरुपात दिली

आहे. या कंपनीचे पदाधिकारी श्री. मनजित बाली, श्रीमती क्षिप्रा, श्रीमती नेहा खरे व इतर यांचे संस्थेच्या वतीने मी शतश: आभार मानतो.

३. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व वात्सल्य ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र गेल्या १३-१४ वर्षांपासून चालवला जात आहे. या एक वर्षाच्या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रत्येक वर्षी कांजुरमार्ग व सानपाडा अशा दोन्ही प्रकल्पातील मिळून १०० मुलींना प्रवेश दिला जातो. यापैकी काही मुली महाराष्ट्रातील अतिशय दुर्गम भागातून संस्थेत शिकायला येतात. अशा मुलींचा खर्च संस्था भागवते. अहवालसालात अशा २७ मुली संस्थेत निवासाला होत्या. या मुलींचे भोजन, आरोग्य, कपडालत्ता,शिक्षण या सर्व गरजा संस्था भागवते. मुंबईतील आर.पी.जी. फाउंडेशनने त्यांच्या 'संजीवनी' या उपक्रमांतर्गत या मुलींचा सर्व खर्च करण्याचे ठरवले. यासाठी या फाउंडेशनने 'वात्सल्य' ला कांजुरमार्ग प्रकल्पासाठी रु. १६,४०,१६३/- व सानपाडा प्रकल्पासाठी रु. ३,१६,१४५/-असे एकूण रु. १९,५६,३०८/- इतकी देणगीची रक्कम दिली. आर.पी.जी. फाउंडेशनचे पदाधिकारी श्री. पार्थ सरवटे, श्री. जगन्नाथ, श्रीमती मंगला देवरुखकर व इतर यांचा मी खूप खूप आभारी आहे.

**इतर कंपन्यांकडून मिळालेल्या देणग्या खालीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| फुग्रो सर्वे इंडिया प्रा. लि. | रु. ९,४५,४९९/- |
| मॅक केम प्रोडक्ट्स इंडिया प्रा. लि. | रु. ६,००,०००/- |
| श्री. विक्रम उत्तमसिंग | रु. ५,४६,०००/- |
| युनिडीझाइन ज्वेलरी प्रा. लि. युनिट २ | रु. ३,६०,०००/- |
| अल्वारेझ अँड मार्शल इंडिया प्रायव्हेट लि. | रु. २,७१,०००/- |
| नेक्स्ट पोलीमर्स लि. | रु. २,५०,०००/- |
| हिंदुस्तान लिवर एजुकेशनल अँड वेल्फेअर ट्रस्ट | रु. २,००,०००/- |
| वेरान्तास रीयालटी प्रा. लि. | रु. २,००,०००/- |

## महाशिवरात्र व रामनवमी

अहवालसालात दि. २१ फेब्रुवारी २०२० रोजी महाशिवरात्रीच्या निमित्ताने (१) श्रीपार्लेश्वर शिवमंदिर - विलेपार्ले व (२) श्रीस्वयंभू शिवमंदिर - मोतीलाल नगर, गोरेगांव येथे सालाबादप्रमाणे संस्थेची प्रचार / प्रसार निधी केंद्रं चालवली. ही प्रचार निधी केंद्रे चालवायला दिल्याबद्दल मंदिरांच्या विश्वस्तांचा मी आभारी आहे. सदर केंद्रे चालवण्यासाठी मदत करत असलेल्या श्री. प्रमोद ओक, श्री. गजानन शानभाग, श्री. एन. डी. साठे, श्री. सुनील परचुरे, श्री. संजय चोगले, श्री. दिलीप गोखले, श्री. दिलीप जोशी, श्री. दिलीप आपटे, श्री. वासुदेव संत, श्रीमती कल्पना वैद्य, श्रीमती श्रद्धा सामंत, श्रीमती वैभवी तिरोडकर, श्रीमती मनीषा पुराणिक या सर्व कार्यकर्त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

गेली बरीच वर्षे रामनवमीच्या निमित्तानेही बोरिवलीच्या चोगले राम मंदिरामध्ये संस्थेचं प्रचार / प्रसार निधी केंद्रं चालवलं जातं. परंतु यावर्षी कोविड-१९ च्या प्रचंड तणावामुळे हे प्रचार / प्रसार निधी केंद्रं चालवता आले नाही.

# सानपाडा सेवा प्रकल्प

वात्सल्य ट्रस्टचा सानपाडा प्रकल्प सुरु होऊन २० वर्षे झाली. सदर प्रकल्पात बालिकाश्रम, वृद्धाश्रम, संगणक प्रशिक्षण वर्ग, रुग्णसहाय्यक प्रशिक्षण वर्ग, अपंग पुनर्वसन केंद्र इत्यादी उपक्रम राबविले जातात. गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत नवी मुंबई मधील एक अग्रगण्य सामाजिक संस्था म्हणून वात्सल्यचे नाव झाले आहे.

## बालिकाश्रम

२०१९-२० या अहवालसालात संस्थेच्या बालिकाश्रमात **५४** मुली निवासाला होत्या. अनाथ किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींच्या कपडालत्ता, भोजन, निवास, आरोग्य व शिक्षण या सर्व गरजा संस्था भागवते. या मुलींना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागाने नियुक्त केलेल्या बालकल्याण

समितीमार्फत बालिकाश्रमात दाखल केले जाते. प्रकल्पाजवळच असलेल्या विवेकानंद संकुल या विद्यालयात या सर्व मुली शिकतात. विवेकानंद संकुलाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, शिक्षकांचे व कर्मचाऱ्यांचे ते वेळोवेळी संस्थेला करत असलेल्या सहकार्याबद्दल शतशः आभार. मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निष्णात शिक्षक संस्थेत येऊन नि:स्वार्थ भावनेने मुलींना शिकवतात.

शिक्षणाबरोबरच मुलींच्या क्रीडा व कलागुणांच्या वृध्दीसाठी शिक्षक, कर्मचारी व कार्यकर्ते प्रयत्नशील असतात. बालिकाश्रमात १५ ऑगस्ट व २६ जानेवारी ह्या राष्ट्रीय सणांसोबत पारंपारिक धार्मिक उत्सव साजरे केले जातात. सानपाडा सेवा प्रकल्पाला २० वर्षे पूर्ण झाल्या निमित्त्य श्री सत्यनारायण पूजा ८ फेब्रुवारी २०२० रोजी आयोजित करण्यात आली. गुढी पाडवा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, श्री गणेश चतुर्थी, नवरात्रोत्सव, क्रिसमस, होळी इत्यादी सण उत्साहात साजरे करण्यात आले. तसेच श्रावण महिन्यात आणि माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने आवर्तने पण करण्यात आली.



दि. १ मे २०१९ रोजी अवर चिल्ड्रन या संस्थेमार्फत आयोजित झालेल्या नृत्यस्पर्धेत मुलींनी अतिशय सुंदर नृत्य सादर केले. याच संस्थेने दि. १४ मे व १५ मे रोजी नेरळ येथे बालिकाश्रमातील मुलींना सहलीला नेले. २०१९ च्या मी महिन्यात सु-सुमेर फाऊनडेशन च्या CSR कार्यक्रमांतर्गत मुलींसाठी एक महिन्याची त्यांच्या विविध कलागुणांना वाव देणारे शिबीर आयोजित केले होते. त्यात इंग्रजी भाषेच्या मुलभूत ज्ञानावर व संभाषण कलेवरहि भर देण्यात आला. अशा तऱ्हेने काळ आणि अभ्यास असा दोहोंचा संगम ह्या शिबिरात साधण्यात आला. दिनांक ११ ऑगस्ट २०१९ ला नेरूळ च्या डी. वाय. पाटील कॉलेजच्या सभागृहात झालेल्या बहारदार गीतांच्या कार्यक्रमात बालिकाश्रमातील कुमारी सायली जावळे हिने इशस्तवन सादर केले. कार्यक्रमाला संस्थेतील मुलीहि उपस्थित होत्या. दिनांक १ डिसेंबर २०१९ ला हिरानंदानी गार्डन, पवई येथे मुलींची सहल गेली होती.

दि. १४ डिसेंबर २०१९ रोजी गोदरेज अँड बॉइस, विक्रोळी कंपनीने बालिकाश्रमातील २० मुलींना त्यांच्या फेअरवेल पार्टीच्या वेळी निमंत्रित केले होते. मुलींनी कार्यक्रमाचा उत्तम प्रकारे आस्वाद घेतला.

२२ ते २४ डिसेंबर २०१९ ह्या कालावधीत जिल्हा महिला आणि बालकल्याण खाते, ठाणे जिल्हा यांच्या तर्फे उल्हासनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या बाल मेळाव्यात विविध सेवाभावी संस्थांतील व सरकारी संस्थांतील दोन हजाराहून अधिक मुलामुलींनी भाग घेतला होता. वात्सल्याच्या मुलीनी आपल्या क्रीडानैपुण्याची चुणूक दाखवत खालील प्रमाणे अनेक बक्षिसे मिळविली.

१. प्रथम क्रमांक – कब्बडी स्पर्धा
२. प्रथम क्रमांक – १०० मीटर धावणे – कु. क्रांती पाडेकर
३. प्रथम क्रमांक – कॅरम – कु. क्रांती पाडेकर
४. प्रथम क्रमांक – चमचा-गोटी – कु. वंदना अरुणदुधीयार
५. द्वितीय क्रमांक – खो खो
६. द्वितीय क्रमांक – रिले शर्यत

'बियोंड एज्युकेशन' ह्या संस्थेने आयोजित केलेल्या शिबिरातही मुलीनी भाग घेतला.

'जिल्हा महिला आणि बालकल्याण खाते' यांच्या कोकण विभागाने 'डेव्हिड ससून औद्योगिक शाळा', माहीम, मुंबई येथे आयोजित केलेल्या 'चाचा नेहरू बाल महोत्सव' मध्ये मुलींनी भाग घेतला. दिनांक १९ ते २१ जानेवारी २०२० रोजी झालेल्या ह्या बाल महोत्सवात कोकण विभागातील विविध संस्थांमधील मुलामुलींनी भाग घेतला. बालिकाश्रमातील मुलींनी स्पर्धेत खालीलप्रमाणे विविध बक्षिसे मिळविली

| | | |
|---|---|---|
| १. | प्रथम पारितोषिक – नृत्य | कु. सायली जावळे, कु. प्रियाज्योती शेट्टी, कु. रिया जैन, कु. सविता कांबळे, कु. सोनी राजभर, कु. क्रांती पाडेकर |
| २. | प्रथम पारितोषिक – बुद्धीबळ | कु. जना सोळंके |
| ३. | द्वितीय पारितोषिक – कबड्डी (छोटा गट) | कु. कौशल्या मुथैय्या, कु. वंदना अरुणदुधीयार कु. सोनी राजभर, कु. सुप्रिया राजभर, कु. प्राची पाटील, कु.रूपा राठोड, कु. तन्वी कांबळे |
| ४. | द्वितीय पारितोषिक – वक्तृत्व | कु. सुधा लाडी |
| ५. | तृतीय पारितोषिक – हस्ताक्षर | कु. तन्वी कांबळे |
| ६ | तृतीय पारितोषिक – चित्रकला | कु. प्रियाज्योती शेट्टी |

मुलींनी शाळेतर्फे घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांतही यश संपादन केले.
कु. सायली जावळे हिने मानव सेवासंघ, सायन, मुंबई येथे ७ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या सिक्रेट सुपरस्टार ह्या गायनाच्या स्पर्धेत भाग घेतला.
दिनांक १ मार्च २०२० रोजी नॅशनल पार्क, बोरीवली, मुंबई इथे मुलींची सहल नेण्यात आली.

**'यु अँड आय' ट्रस्टचा उपक्रम –** संपूर्ण शालेय वर्षात **यु अँड आय ट्रस्ट** ह्या संस्थेच्या तरुण कार्यकर्त्यांनी दर शनिवारी आणि रविवारी नियमितपणे संस्थेत येऊन बालीकाश्रमातील मुलींचे 'इंग्रजी भाषेचे ज्ञान व सुयोग्य वर्तणूक' यांचे वर्ग घेतले. व्यावसायिकरीत्या आखलेल्या अभ्यासक्रमाद्वारे खेळीमेळीत चालणारे हे वर्ग मुलींना अत्यंत आवडले व त्यांच्यात इंग्रजी भाषेची भीती कमी होऊन भाषेविषयी गोडी निर्माण होण्यास मदत झाली. तसेच त्यांची वर्तणूक अधिक चांगली होण्यास मदत झाली. प्रत्येक मुली मागे एक कार्यकर्ती नेमल्याने त्यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होऊन मुलींच्या मानसिक विकासातही मदत झाली. सदर संस्थेचे कु. तृप्ती प्रभू, कु. राजसी सावंत, श्री. विहंग जगदाळे, श्री. आदी फर्नांडेस, कु. भावना बिश्त आणि कु. मेहविश काझमी यांचे व त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांचे मनापासून आभार.

**'येस आय कॅन' ट्रस्टचा उपक्रम –** **येस आय कॅन** ट्रस्टतर्फे संस्थेतील महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींना इंग्रजी संभाषणाचे प्रशिक्षण देण्यात आले. वर्षभर नियमितपणे चाललेल्या या उपक्रमाचा त्यांना चांगलाच फायदा झाला. पुढीलवर्षी बालिकाश्रमातील शाळेत जाणाऱ्या मुलीनाही सदर उपक्रमात समाविष्ट करण्याचा मानस आहे. येस आय कॅन ट्रस्टच्या ट्रस्टी श्रीमती नेहा खरे व त्यांच्या कार्यकर्त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे.



## आरोग्य

संस्थेतील सर्व मुलींची नियमितपणे आरोग्यविषयक तपासणी होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास ऐनापुरे, डॉ. सौ. सुजला ऐनापुरे व इतर तज्ज्ञ वर्षातून दोन वेळा मुलींची तपासणी करतात. तसेच डॉ. अलका बेडेकरही

वेळोवेळी संस्थेला भेट देऊन मुलींची आरोग्य तपासणी करतात.  शिवाय मुली किरकोळ आजारी पडल्यास डॉ मानधना यांच्याकडे उपचारासाठी नेले जाते. दन्तचिकीत्सेसाठी  डॉ. शेडगे तसेच नेरूळच्या डी. वाय.  पाटील रुग्णालयात नेले जाते. वाशी येथील नवी मुंबई महानगर पालिका रुग्णालयातील तसेच सानपाड्यातील सुरज हॉस्पिटलमधील  डॉक्टरांचे,  परिचारिकांचे व इतर कर्मचाऱ्यांचे त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानावे तेवढे थोडे आहेत.  सर्व मुलींची प्रकृती उत्तम आहे.  सुप्रसिद्ध त्वचारोग तज्ञ डॉ. सौ.  रश्मी धुर्वे यांनीही मुलींची  आरोग्यतपासणी  केली.   वरील सर्व तज्ञांचे मनापासून आभार.

## वृद्धाश्रम

बालिकाश्रमासोबतच संस्थेत चालवल्या जाणा-या वृद्धाश्रमाचा लाभ अहवालसालात एकूण **२१** ज्येष्ठ नागरिकानी घेतला.  उत्तम आहारासोबतच करमणुकीसाठी त्यांच्यासाठी दूरदर्शन संच, वृत्तपत्र -  वाचनालय इ.  ची व्यवस्था आहे.  संस्थेच्या आवारात स्थित गणेश मंदिरामुळे संस्थेचे वातावरण सकारात्मक राहण्यास मदत होते.
वात्सल्यमधील एकंदरीत वातावरण घरगुती असल्याकारणाने आजी-आजोबांना एकटेपणा जाणवत नाही.  संस्थेचे कार्यकर्ते, हितचिंतक,  पाहुणे, देणगीदार इ.  वेळोवेळी भेट देऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करत असतात.  अनेक महिला मंडळे संस्थेच्या वृद्धाश्रमाला भेट देऊन त्यांच्यासाठी गाण्यांचा कार्यक्रम, कथाकथन,  कविता वाचन इ.  मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करतात.



## संगणक प्रशिक्षण केंद्र

दि.  ३ जानेवारी २०१२ रोजी सानपाडा प्रकल्पात संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु झालं.  नियमित संगणक प्रशिक्षण वर्गासोबतच विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास, संभाषण कला, नेतृत्व, मुलाखती इत्यादी विषयांवर प्रशिक्षण दिले.  ह्या प्रशिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्याना सुलभतेने रोजगार प्राप्त करण्यास झाला.  तुर्भे येथे सुरु केलेल्या संगणक प्रशिक्षण वर्गाचा फायदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना झाला आहे व त्यांच्यासाठी ज्ञानाची कवाडे उघडली आहेत व रोजगाराच्या  संधी उपलब्ध झाल्या आहेत.  LTI  महापेच्या अधिकारी आणि कर्मचारीवर्गाचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत.



## रुग्णसहाय्यक प्रशिक्षण वर्ग

सानपाडा प्रकल्पातील रुग्णसहाय्यक प्रशिक्षण अभ्यासक्रम हा नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाशी संलग्न आहे. अहवालसालात या अभ्यासक्रमात ३९ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला. डॉ. ज्योती जाधव, सिस्टर श्रीमती रेणुका साळगावकर, सिस्टर श्रीमती क्षमा पेंडसे यांनी विद्यार्थिनींना विविध विषय शिकविले. ऐरोली येथील इंद्रावती इस्पितळात विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक शिक्षण दिले गेले. इंद्रावती इस्पितळ, ऐरोली येथील मेडीकल डिरेक्टर डॉ. उमेश तेलतुंबडे, सि.इ.ओ. श्री. शंकर चव्हाण आणि श्रीमती दिपाली खाडे यांनी दिलेल्या मार्गदर्शना बद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.



## पुनर्वसन केंद्र

वात्सल्यच्या सानपाडा येथील पुनर्वसन केंद्रात दिल्या जाणाऱ्या फिज़िओ थेरपीचा लाभ नव्या मुंबईतील जेष्ठ नागरिकांना होतो. तसेच विशेष गरजा असलेल्या लहान मुलांसाठी ओक्यूपेशन थेरपी, विशेष शिक्षण व स्पीच थेरपीची सोय आहे, ज्यामुळे मुलांच्यामध्ये लक्षणीय सुधारणा दिसून येते व त्यांचे जीवन सुकर होते.

## निधी संकलन

वात्सल्यच्या सानपाडा प्रकल्पाला नव्या मुंबईतील विविध देणगीदारांकडून उत्तम सहाय्य मिळत असते. अनेक व्यापारी व व्यावसायीक, ज्यात केमिस्ट असोसिएशन, धन बाजार, फळ बाजार व भाजी बाजार येथील व्यापाऱ्यांचा समावेश आहे. भविष्यातही त्यांचा वात्सल्यला असाच आधार राहील ह्याची मला खात्री आहे. सर्व देणगीदारांचे, कार्यकर्त्यांचे व कर्मचाऱ्यांचे मी आभार मानतो.

वात्सल्यला सदैव मदतीचा हात देणाऱ्या नव्या मुंबईतील खालील देणगीदार व प्रतिष्ठित मंडळींचे आभार मानने माझे कर्तव्य आहे. नवी मुंबई रिटेल केमिस्ट आणि होल्सेलर्स असोसिएशन चे अध्यक्ष श्री. राकेश नलावडे व सेक्रेटरी श्री. सुनील छाजेड, श्री. विजय ताम्हाणे आणि डॉ. अनिल छाजेड, दि कन्झुमर प्रोडक्ट्स डीसट्रीब्यूटर्स असोसिएशन, श्री. भारतभाई दर्जी, श्री. मोहनशेठ डोंगरे, श्री. काळेश ताजणे, चेंबूर महिला समाज यांची वात्सल्यला नियमित मदत मिळते.

नवी मुंबई महानगर पालिकेचे नगरसेवक श्री. सोमनाथ वासकर, श्रीमती कोमल वासकर आणि श्रीमती संगीता बोऱ्हाडे यांचीही वात्सल्याला वेळोवेळी मदत होते.

वरील सर्व देणगीदारांचे व हितचिंतकांचे आभार.

## अलिबाग सेवा प्रकल्प

वात्सल्यचा  अलिबाग प्रकल्प ७ जानेवारी २००७ रोजी सुरु झाला. प्रकल्पाचे कामकाज व प्रगती समाधानकारक आहे. अहवालसाली विविध मान्यवरांनी अलिबाग येथील वात्सल्यच्या प्रकल्पाला भेट देऊन सुरु असलेल्या सेवाभावी कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.
वर्षभरात अलिबाग प्रकल्पात ७ बालकांना प्रवेश देण्यात आला व 2 बालकांना दत्तक देण्यात आले. ३ बालकांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. वर्ष अखेरीस अलिबाग प्रकल्पात ७ बालके होती.

अलिबाग प्रकल्पाचा वर्धापन दिन ७ जानेवारी २०२० रोजी साजरा करण्यात आला व त्याप्रसंगी श्री सत्यनारायण पुजेचेही आयोजन करण्यात आले होते. देणगीदार, हितचिंतक व दत्तक पालकांनी संस्थेस भेट देऊन निधी संकलनास हातभार लावला, त्या सर्वांचे मी आभार मानतो.
डॉ. धामणकर, डॉ. आदित्य चेवले व डॉ. अरविंद टकले हे वेळोवेळी बालकांची तपासणी करून त्याचे आरोग्य सुदृढ ठेवण्यास मदत करतात.





पुनर्वसन केंद्र तर्फे अलिबाग प्रकल्पात व रायगड जिल्ह्यात विविध उपक्रम राबविले जातात, ज्यांना उत्तम प्रतिसाद मिळतो.

**कोरोनाच्या संसर्गामुळे झालेल्या लॉकडाऊनमध्ये खालील देणगीदारांनी अलिबाग प्रकल्पाला वस्तुरूप देणगी देऊन बहुमूल्य अशी मदत केली .**

१. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अलिबाग – किराणा सामान व Sanitizer
२. अलिबाग तालुका अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी– किराणा सामान
३. तहसीलदार कार्यालय, अलिबाग – किराणा सामान
४. ब्राह्मण संघ, अलिबाग – किराणा सामान
५. लवेश नाईक, नौशाद पटेल, अलिबाग – किराणा सामान
६. राजेश वारंगे, अलिबाग – किराणा सामान
७. वैभव आठवले, अलिबाग - Sanitizer
८. नितीन जैन, अलिबाग - Lactogen No. १ व २, dettol, phynile, किराणा सामान
९. राहुल मेडिकल, अलिबाग – बिस्कीट पुडे व साजूक तूप, Lactogen No. १ व २
१०. हित कटारिया, अलिबाग – बिस्कीट, phynile व साखर
११. Helping Hand Group, अलिबाग – तांदूळ, बिस्कीट, Lactogen No. २
१२. प्रवीण घरत, अलिबाग - Lactogen No. १, जॉन्सन बेबी पावडर

१३. कुलाबा ढोल ताशा पथक, अलिबाग - Lactogen No. १
Lactogen No. २
१४. रोशन जैन, अलिबाग – पतंजली बिस्कीट
यात्व्यतिरिक्त हस्ते परहस्ते ज्या देणगीदारांनी प्रकल्पाला इतर बाबतीतही सहकार्य केले त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

## बदलापुर सेवा प्रकल्प

बदलापूर येथील भोज गावात वात्सल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. आठवड्यातून तीन दिवस केंद्रावर प्राथमिक आरोग्य सेवा पुरविली जाते. तसेच तीन दिवस आसपासच्या खेड्यात व पाड्यांवर जावून डॉक्टर आरोग्य तपासणी व औषधोपचार करतात. सदर प्रकल्पात वृद्धाश्रम, औद्योगिक प्रशिक्षण, आरोग्य केंद्र इत्यादी विविध उपक्रम २०२२ सालापर्यंत सुरु करण्याचा मानस आहे.




## संकीर्ण

१. दि. २७ एप्रिल २०१९ रोजी आपल्या देणगीदार श्रीमती वर्षा भगत, मुलुंड यांनी आपल्या सहका-यांसोबत गायनाचा बहारदार कार्यक्रम आयोजित केला.




२. दि. ५ जून २०१९ रोजी स्वनाथ फाउंडेशनतर्फे संस्थेचे कार्यवाह श्री. ग.अ. दामले यांना महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.
३. दि. १३ ऑगस्ट २०१९ रोजी रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्राच्या वाळवंडा येथील सॅटेलाईट सेंटर चे उद्घाटन करण्यात आले.

४. दि. १४ डिसेंबर २०१९ रोजी गोदरेज कॉलनीतर्फे फनफेअरचे आयोजन केले होते. आपले नियमित देणगीदार श्री. नरीमन बच्चा यांनी या फनफेअरला संस्थेच्या कांजुरमार्ग व सानपाडा येथील मुला मुलींना नेण्याची व्यवस्था केली होती. सर्व मुलामुलींनी विविध कार्यक्रमात भाग घेवून फनफेअरचा आनंद लुटला.



५. दि. २५ जानेवारी २०२० रोजी संस्थेच्या कार्यकर्त्यांचा एक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात संस्थेच्या कार्यकर्त्यांना देणगी गोळा करताना येणा-या अडचणी, त्यांच्या काही सूचना, नवनवीन उपक्रमांविषयी विचारांची देवाणघेवाण यासंबंधी चर्चा करण्यात आली.
६. दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी संस्थेच्या रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थिनींचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.
७. दि. ३० सप्टेंबर २०१९ रोजी संस्थेच्या ज्येष्ठ सेविका श्रीमती शुभांगी सावंत व दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी श्रीमती सविता केणी यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. आईच्या मायेने बालकांची काळजी घेणाऱ्या या दोघींना उत्तम आरोग्य लाभो व त्यांचे निवृत्ती नंतरचे जीवन सुखासमाधानाचे जावो हीच प्रार्थना.
८. दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी संस्थेच्या पुनर्वसन केंद्रातर्फे विभागात उपचारासाठी येणारी मुले व संस्थेतील निवासी विशेष मुले यांच्यासाठी एक क्रीडा-स्पर्धा आयोजित करण्यात आली. सर्व मुलामुलींनी या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला.
९. दि. २३ फेब्रुवारी २०२० रोजी संत निरंकारी सेवा मंडळ यांच्यातर्फे संस्थेत स्वच्छता मोहीम राबवली गेली. या मंडळातील अनुयायांनी संस्थेत विविध विभागांची स्वच्छता केली.

## श्रद्धांजली

१. संस्थेचे माजी विश्वस्त कै. श्री. चंपकनाथ यांचे वृद्धापकाळाने दुख:द निधन झाले.
२. संस्थेचे माजी विश्वस्त कै. श्री. रंगनाथ हुकेरी यांचे दि. ३ मे २०१९ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुख:द निधन झाले.
३. दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी गोकुळाष्टमीच्या दिवशी वात्सल्यचे हितचिंतक कै. डॉ. रामदास गुजराथी यांचे दुख:द निधन झाले. गोखले कॉलेज - बोरीवलीचे निवृत्त मुख्याध्यापक व ज्येष्ठ नागरिक सेवा संघ - वझिरा याची अध्यक्षस्थानी राहून 10 वर्षे धुरा यशस्वीपणे सांभाळणारे गुजराथी सर हे वात्सल्यच्या दिवाळी भेट कुप्न्सच्या वितरण व त्यामार्फत होणारे निधी संकलन या कामात अग्रेसर होते.

## माणुसकीचा प्रत्यय

अहवालसालात डिसेंबर २०१९ पासुन सुरु झालेल्या COVID 19 (Pandemic Corona virus threat) च्या प्रादुर्भावाने अखंड भारतभर जो हाहाकार माजला. त्याचे पडसाद संस्थेलाही भोगावे लागले. देणग्यांचा ओघ आटू लागला. देणगीदारांचे संस्थेत येण्याचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे वस्तुरुपातील देणग्यांचे प्रमाणही घटले. आर्थिक टंचाई भासू लागली.

अशा वेळी व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाखाली वात्सल्य संस्थेचे कर्मचारी कंबर कसून उभे राहिले. अर्भकालयात अर्भकांना आईच्या मायेने जोपासणा-या सेविका प्रसंगी १२ / २४ तास आपली सेवा देऊ लागल्या. लोकलने संस्थेत येणारे कर्मचारी तर नाईलाजाने येउच शकत नसल्याने भांडूप / कांजुरमार्ग परिसरात रहाणारे कर्मचारी म्हणजेच नर्स, सुपरवायझर, सेविका या सर्वांनी मिळून बालकांच्या आरोग्याची धुरा सांभाळली. स्वच्छतेचे सर्व नियम पळून आपला व बालकांचा जीव मोलाने जपून सर्व कारभार सुरळीत चालवला.

काही स्थायिक कार्यालयीन कर्मचारी एक दिवसा आड संस्थेत येऊन बँकेची व कार्यालयाची खोळंबलेली कामे रुळावर आणण्याचा प्रयत्न करत होती. घरी बसून ज्या कर्मचा-यांना work from home करणे शक्य होते, त्यांनी संस्थेच्या ज्या देणगीदारांचे email ids उपलब्ध होते त्यांना देणग्यांसाठी आवाहन केले. मला सांगायला अभिमान वाटतो की, या आवाहनाला देण्गीदारांकून उत्तम प्रतिसाद मिळाला. खरंतर या कालावधीत प्रत्येक नागरिकाची मग तो भारतीय असो वा परदेशी आर्थिक परिस्थिती थोडी नाजूक होती. परंतु तरीही संस्थाचालकांच्या निरलस वृत्तीचे फळ म्हणा किंवा दिवंगत नाना-दामलेकाका यांच्या आजपर्यंतच्या परिश्रमांच्या पुण्याईने म्हणा अपेक्षेपेक्षा अधिक निधी प्राप्त झाला. ज्यामुळे संस्थेला पुन्हा नवी उभारी मिळाली आणि माणुसकीचा प्रत्यय आला.

डिसेंबर २०१९ ते मार्च २०२० या कालावधीत COVID 19 साठी ज्या देणगीदारांनी देणग्या दिल्या अशा देणगीदारांची मी संस्थेच्या वतीने शतशः आभार मानते. आपण सर्वांनी संस्थेप्रती दाखवलेला विश्वास व लोभ कायम वृद्धिंगत राहो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करते.

COVID 19 चा खर अजूनही पूर्णतः संपलेला नाही. येणारा पुढील काल हा आपल्या सर्वांसाठीच सत्वपरीक्षेचा आहे. माझे या अहवालाच्या निमित्ताने सर्व हितचिंतकांना एकच कळकळीचे सांगणे आहे की, कृपया आपली व आपल्या कुटुंबाची काळजी घ्या. स्वच्छतेचे व विलगीकरणाचे सर्व नियम काटेकोरपणे पाळा. पुढील वर्षभरात तरी ही काळजी घेणे अनिवार्य आहे. 'जान है तो जहाॅ है' या वचनाप्रमाणे काही कालावधीकरता का होईना आपल्या आवडीनिवडी यांच्यावर बंधने घाला. घरातल्या घरात राहून छंद जोपासा. जास्तीत जास्त आपल्या कुटुंबाला वेळ द्या. आत्मनिर्भर व्हा आणि आत्मपरीक्षण करा. धन्यवाद !!

## **कौतुकास्पद कामगिरी**

१. संस्थेने सामाजिक जाणीवेच्या हेतूने COVID 19 मदतकार्यासाठी PRIME MINISTER CARE फंडाला रु. ३,००,०००/- देणगी दिली.
२. तसेच CHIEF MINISTER CARE फंडाला रु. २,००,०००/- इतकी देणगी दिली.
३. विक्रोळी येथील शुश्रुषा हॉस्पिटल व ऐरोली येथील इंद्रावती हॉस्पिटल यांना उत्कृष्ट प्रतीचे प्रत्येकी १०० PPE किट्स देणगी म्हणून दिले.

- आपणा सर्व हितचिंतकांना कळविण्यास आनंद होतो की, संस्थेने COVID 19 च्या कठीण काळातही आपल्या अर्भकालय / बालिकाश्रम / वृद्धाश्रम या सेवा काही प्रमाणात सुरु ठेवल्या होत्या. तसेच पुनर्वसन केंद्र / रुग्णसहाय्यक प्रशिक्षण केंद्र / संगणक प्रशिक्षण केंद्र या उपक्रमातील सेवाही काही अंशी (ऑनलाईन) सुरु होत्या.

## विशेष सूचना

संस्थेचे ताळेबंद आणि आय- व्ययपत्रके संक्षिप्त स्वरुपात देण्यात आली आहेत. ज्यांना सविस्तर पत्रके पाहिजे असतील त्यांनी कृपया संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा .

पर्यावरणाविषयी विशेष जागरूकता लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. वृक्षसंवर्धनाच्या हेतूने कागद वाचवा मोहीम प्रकर्षाने राबविली जात आहे. त्यादृष्टीने ज्यांना शक्य आहे अशा हितचिंतकांनी आपला ई.मेल आय- डी. कळवावा. त्यायोगे संस्थेला त्यांच्याशी संपर्क साधने सुलभ होईल .

## वेबसाईट

आपण वात्सल्यच्या www.vatsalyatrustmumbai.org येथे जरूर भेट द्यावी .

## संस्थेचे कार्यकर्ते , देणगीदार व मान्यवरांना नम्र विनंती

संस्थेचे अनेक कार्यकर्ते निधी संकलनासाठी पावती पुस्तके, दिवाळी भेट कुपन्स घेऊन जातात पण वेळच्यावेळी ती पुस्तके व जमा केलेला निधी कार्यालयात आणून देत नाहीत. परिणामी लेखापरीक्षणालाऑडी) टविलंब ( होतो. तरी सर्व कार्यकर्त्यांनी याबाबत काटेकोरपणा पाळावा व काही अडचण असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा ही विनंती .आमचे कार्यकर्ते आपल्यापर्यंत देणगी आणण्यासाठी पोहोचू शकले नाहीत तर गैरसमज करून न घेता आपल्या देणग्या धनादेशाद्वारेसंस्थेला टपालाने अथवा कुरिअरने पाठवाव्यात .देणगीदार आमची अडचण समजून घेतील याची खात्री आहेच. त्याचबरोबर ज्यांना शक्य आहे अशा मंडळींनी संस्थेशी ईमेल-ने संपर्क साधावा.